**अति तात्काळ**

जा.क्र.कृषिआ/फलो-२/पिसंयो/१४-१५/१२६१/१४
कृषि आयुक्तालय (फलोत्पादन) महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११ ००५ दिनांक -०२/०६/२०१४

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक**
ठाणे/पुणे/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर.

**विषय :- जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना (फलोत्पादन पिके) सन २०१४-१५ मध्ये राज्यात राबविणेबाबत ....**

सन २०१४-१५ मध्ये फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसालापिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकावरील कीड रोग नियंत्रणासाठी औषध वाटप/फवारणी कार्यक्रम ५० टक्के अनुदानावर राबविण्यासाठी जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजनेच्या मार्गदर्शक सुचना त्याचप्रमाणे पिक संरक्षण योजनेअंतर्गत फवारणीसाठी लागणारी औषधे, त्याचे परिमाण व प्रति हेक्टरी ५० टक्के अनुदान (प्रपत्र-१), त्याचप्रमाणे जिल्हानिहाय पिकनिहाय मंजूर भौतिक व आर्थिक लक्ष याची माहिती (प्रपत्र-२) मध्ये सहपत्रित करण्यात येत आहे.

प्रपत्र-२ मध्ये जिल्हा नियोजन व विकास मंडळाने मंजूर केलेल्या जिल्हानिहाय अनुदानाची माहिती देण्यात आलेली आहे. त्यामध्ये काही बदल झाल्यास जिल्हा नियोजन व विकास मंडळाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या मर्यादेत राहूनच खर्च करणेत यावा व त्याप्रमाणे योजना राबविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

सन २०१४-१५ मध्ये काही औषधांचे दर अद्याप ठरविण्यात आलेले नाहीत त्यामुळे सन २०१३-१४ मधील काही औषधांचे दर विचारात घेऊन प्रति हेक्टरी अनुदान मर्यादा तसेच भौतिक व आर्थिक अनुदान निश्चित केलेले आहे. सन २०१४-१५ मधील उर्वरीत औषधाचे दर प्राप्त झाल्यावर त्यामध्ये बदल असल्यास त्याप्रमाणे कळविण्यात येईल. तरी मंजुर असलेल्या अनुदानाच्या अधिन राहुन औषधांची आगाऊ नोंदणी करावी, जेणेकरुन खरीप हंगामामध्ये औषधांचा तुटवडा भासणार नाही.

**सोबत- वरील प्रमाणे**
**मार्गदर्शक सुचना व प्रपत्र १ ते ५**

**-/स्वा/-**
**संचालक फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे- ४११००५**

**प्रत :**

१) **मा. अप्पर मुख्य सचिव,** (कृषि व फलोत्पादन) कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) **व्यवस्थापकीय संचालक**, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, प्रभादेवी, मुंबई-२५ यांना माहितीसाठी.
   २/- कृषि विकास अधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे औषधांचा पुरवठा तात्काळ व वेळेत करणेबाबत कृपया कार्यवाही व्हावी.
३) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** (सर्व) यांना माहितीसाठी आवश्यक कार्यवाहीसाठी.
४) **कृषि विकास अधिकारी,** (सर्व) यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५) **कृषि उपसंचालक,** (नियोजन) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीस्तव.

## जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना
## मार्गदर्शक सूचना

**१) पिक निहाय क्षेत्र लक्षांक व फवारणी कार्यक्रम-**

सन २०१४-१५ मध्ये सर्व फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके औषधी व सुगंधी वनस्पती या पिकावरील सर्व किड/ रोग नियंत्रणासाठी औषधाचे वाटप/ फवारणी कार्यक्रम ५० टक्के अनुदानावर राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. या वर्षी प्रामुख्याने संत्रा पिकावरील काळी/पांढरी माशी (कोळशी), फायटोप्थोरा रोग, आंब्यावरील तुडतुडे व भुरी रोग, चिकूवरील बी पोखरणारी अळी, नारळावरील ईरिओफाईड माईट्स, सुपारीवरील कोळेरोग, काजू वरील टी-मॉस्कुटो, केळीवरील करपा, बटाट्यावरील करपा रोग, मिरचीवरील चुरडामुरडा, कांदा पिकावरील फुलकिडे व करपा, पानमळ्यावर करपा या किड/रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. या किड/रोगाच्या नियंत्रणासाठी लागणारी किटकनाशके/ बुरशीनाशके शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर पुरवावयाची आहेत. प्रती हेक्टरी लागणारी औषधे, त्याचे परिमाण व अनुदान मर्यादा याबाबतची माहिती प्रपत्र-१ मध्ये तसेच जिल्हा निहाय, पिक निहाय भौतिक व आर्थिक लक्ष याबाबतची माहिती प्रपत्र-२ मध्ये देण्यात येत आहे.

उपरोक्त पिकाव्यतिरिक्त इतर फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकामध्ये अचानक किड रोगाचा प्रादुर्भाव जिल्हयात आढळून आल्यास त्यावरही जिल्हयाला जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या व जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या अनुदानाच्या अधिन राहुन पिक संरक्षण कार्यक्रम राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर पिकावर कृषि विद्यापिठाच्या शिफारशीनुसार औषधाची फवारणी करणेत यावी व त्यानुषंगाने प्रति हेक्टरी ५० टक्के अनुदानाची मर्यादा ठरविण्यात यावी. सदर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपरोक्तप्रमाणे केलेल्या पिकनिहाय बदलाची माहिती त्याचप्रमाणे भौतिक लक्ष्याची माहिती वेळोवेळी कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावी.

**२) लाभार्थी निवड-**

या योजनेअंतर्गत सर्व प्रकारच्या शेतक-यांना (सर्वसाधारण, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती इत्यादी ) लाभ देण्यात यावा. अनुसुचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा. लाभार्थी अल्प भूधारक/सिमांतिक असल्यास प्राधान्य देण्यात यावे.

**३) अनुदान प्रमाण-**

या योजनेतंर्गत पुरवावयाची किटकनाशके / बुरशीनाशके यांच्या एकूण किंमतीच्या ५० टक्के किंवा कमाल प्रपत्र-१ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात खर्च करण्यात यावा. उर्वरित ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असलेली रक्कम लाभार्थी शेतक-यांकडून वसूल करावी.

**४)  किटकनाशके / बुरशीनाशके यांची खरेदी-**

या योजनेअंतर्गत किटकनाशके व बुरशीनाशके आपल्या जिल्ह्याला नियुक्त केलेल्या शासन मान्य पुरवठा संस्थेकडून (महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ) यांच्याकडून खरेदी करण्यात यावीत. संबंधीत किटकनाशके/बुरशीनाशके खरेदी करताना कृषि विभागाने शिफारस केलेली औषधेच खरेदी करण्यात यावीत. औषधांची मागणी तांत्रिक नावाने करावी, तसेच औषधांची खरेदी कृषि आयुक्तालयाने शिफारस केलेल्या दराने करण्यात यावी.

**५)  मागणीचे निर्धारण-**

शेतक-यांकडून मागणी गोळा करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. कृषि विकास अधिकारी यांनी औषधाची मागणी गोळा केल्यानंतर एकूण लागणारे औषध, त्याची किंमत, ५० टक्के अनुदान व शेतक-यांकडून वसुल करावयाची रक्कम इत्यादीबाबत प्रस्ताव तयार करुन त्यास तांत्रीक मान्यता देण्यात यावी. त्यानंतर सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावा. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हयाची औषधाची एकत्रित मागणी पुरवठा संस्थेस नोंदवावी. औषधांची मागणी तांत्रिक नावाने नोंदविण्यात यावी, त्याची प्रत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक आणि कृषि आयुक्तालयास सादर करावी.

**६)  औषधे पुरवठा-**

कृषि विकास अधिकारी यांचे मागणी प्रमाणे महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांनी संबंधित जिल्हा परिषदांना गट पातळीपर्यंत औषधाचा पुरवठा तात्काळ करावा. औषधांच्या वापराचा अंतिम दिनांक (एक्सपायरी डेट) ही पुरवठा केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपेक्षा कमी नाही, याची खात्री कृषि विकास अधिकारी यांनी करावी. प्रथम एकूण मागणीच्या २५ टक्के औषधांची उचल करावी. किटकनाशके / बुरशीनाशके यांचा पुरवठा, किड व रोगाचे नियंत्रण परिणामकारक होण्याच्या दृष्टीने एकाच वेळी केला जात आहे, याची खात्री करावी.

औषधाची फवारणी करतांना औषधाचे प्रमाण, उपयुक्तता, वापराची पध्दत याबाबत कृषि विद्यापीठाने केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन वितरण व वापर करण्यात यावा.

**७)  वाहतुक व साठवण-**

मागणी केलेल्या औषधांची वाहतूक पुरवठा संस्थेने तालुक्यापर्यंत करुन द्यावी व साठवणुकीची व्यवस्था जिल्हा परिषदेने करावी.

**८)  परवानापत्रक-**

गटविकास अधिका-यांच्या अखत्यारीतील ग्रामसेवकांनी शेतक-यांना गटविकास अधिका-याकडून किटकनाशके / बुरशीनाशके उपलब्ध होण्यासाठी परवाना पत्रे (परमीट) द्यावी या परवाना पत्रामध्ये झाडांची संख्या, क्षेत्र, लागणारी किटकनाशके/ बुरशीनाशके यांचे प्रमाण, किंमती व अनुदान दर्शविण्यात यावे.

वितरीत केलेल्या औषधाचे लाभार्थी शेतकरी यांची गावनिहाय यादी करुन ग्रामपंचायतीकडे पाठविण्यात यावी व ग्रामसेवकांनी बैठकीत सादर करावी.

**९) औषधांचे दर-**

सन २०१४-१५ मध्ये सर्व फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकावरील किड/रोग नियंत्रण योजनेअंतर्गत खरेदी करावयाच्या औषधाचे दर हे कृषि विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे राहतील.

**१०) किटकनाशके/बुरशीनाशके यांची बिले अदा करण्याची पध्दत-**

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने जिल्ह्यांना औषधांचा पुरवठा केल्यानंतर कृषि विकास अधिकारी यांचेकडे औषधांची बिले पाठवावीत. औषधे चांगल्या स्थितीत मिळाल्याबाबत साठा रजिस्टरमध्ये नोंद घेतल्याची, नमुने काढल्याची तसेच इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे तयार करावीत. सन २०१४-१५ मध्ये किटकनाशकांच्या गुणवत्ता तपासणीबाबत कृषि आयुक्तालयामधील गुणवत्ता व नियंत्रण शाखेमार्फत निर्गमित करण्यात येणा-या परिपत्रकांचा उपयोग करण्यात यावा. कृषि विकास अधिकारी यांनी औषधांची बिले प्राप्त झाल्यानंतर त्या बिलांची तपासणी करावी. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या बिलाच्या ५० टक्के अनुदानाची रक्कम जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या २४०१ पीक संवर्धन या लेखाशिर्षाच्या मंजूर अनुदानामधून अदा करावी.

**११) अनुदान वितरण-**

सन २०१४-१५ मध्ये मंजूर केलेल्या तरतूदीतून राबविण्यात येणा-या योजनांचा निधी जिल्हाधिकारी यांचे मार्फत वितरीत होणार आहे. तेव्हा आपल्या जिल्हयाला पिक संरक्षण योजनेतंर्गत मंजूर केलेली तरतूद जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेणेबाबत कृषि विकास अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेली लेखाशिर्ष निहाय तरतूद आपल्या जिल्हयाच्या नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**१२) वसुलीबाबत-**

परवाना पत्रे मिळाल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी किटकनाशकांची/ बुरशीनाशकाची ५० टक्के रक्कम शेतक-यांकडून औषध वाटपाचे वेळी वसूल करुन त्याचा भरणा कृषि विकास अधिकारी यांचेकडे करणेत यावा. शेतक-यांकडून ५० टक्के रक्कम औषधे वाटप करतेवेळी वसूल करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील. शेतक-यांकडून वसूल केलेली रक्कम १५ दिवसात एकत्रित करुन कृषि विकास अधिकारी यांचे कार्यालयात जमा करावी. लोकवाट्याची रक्कम कोणत्याही परिस्थितीत चलनाद्वारे शासकीय कोषागरात भरणा करण्यात येऊ नये. त्यानंतर १५ दिवसाने कृषि विकास अधिकारी यांनी सदर वसूल केलेल्या ५० टक्के रकमेचा डिमांड ड्राफ्ट महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाचे नावाने काढून त्यांना देण्यात यावा. असे न केल्यास तात्पुरता अपहार (Temporary misappropriation) झाले असे

समजून कृषि विकास अधिकारी यांचेवर खातेनिहाय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या बाबीचे सनिंयत्रण करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील. औषध वापराचा सविस्तर तपशिल, आवश्यक प्रमाणपत्रे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / विभागीय कृषी सहसंचालक यांचेकडे पाठवावीत. या योजनेतंर्गत खर्च झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र मोहिम संपल्यानंतर एक महिन्यांच्या आत कृषि विकास अधिकारी यांनी कृषि आयुक्तालयास सादर करावे, त्यासाठी वित्तीय वर्ष संपण्याची वाट पाहू नये.

**१३) औषधांचा साठा-**

पिक संरक्षण मोहिमेनंतर शिल्लक राहिलेल्या औषधांचा साठा, औषधांचे पॅकिंग चांगल्या स्थितीत असेल, तर संबंधीत पुरवठा संस्थेस ती परत द्यावीत. त्याप्रमाणे जिल्हा परिषदांनी पिक संरक्षण मोहिम संपल्याबरोबर शिल्लक राहिलेल्या औषधांचा साठा संबंधित संस्थेकडे एक महिन्याच्या आंत परत करावा, तसे केल्याचे विभागीय कृषि सहसंचालक व कृषि आयुक्तालयास कळवावे. कृषि विकास अधिकारी यांनी परत केलेल्या औषधांची रक्कम त्वरीत संबंधित पुरवठा संस्थेकडून वसूल करावी व चलनाने शासकीय कोषागरात भरणा करावी.

**१४) आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत**-

पिक संरक्षण योजनेतंर्गत लेखाशिर्ष २४०१ लेखाशिर्षाच्या मंजूर तरतुदीमधून बिलाची ५० टक्के रक्कम तसेच शेतक-यांकडून वसूल झालेली ५० टक्के रक्कम अशी १०० टक्के रक्कम संबंधित एजन्सीला अदा करणेसाठी कृषि विकास अधिकारी यांना प्राधिकृत करणेत येत आहे. संबंधित जिल्ह्यांना जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेला निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद कोषागारातून काढुन जिल्हानिधीमध्ये ठेवतील. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना आवश्यक तितका निधी वेळोवेळी जिल्हानिधीतून काढण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१५) मुल्यमापन-**

पीक संरक्षण योजनेतंर्गत राबविण्यात येणा-या निरनिराळया मोहिमातील कामाचे मुल्यमापन कृषि विद्यापीठातील तज्ञांनी करावयाचे आहे. त्यासाठी लागणारी माहिती म्हणजेच लाभार्थीची गांववार यादी, क्षेत्र फवारणीकरिता वापरण्यात आलेली औषधे इत्यादी माहिती योग्य वेळी कृषि विद्यापीठातील संबंधित तज्ञांना पाठविण्याची व्यवस्था कृषि विकास अधिकारी यांनी करावी. त्याचप्रमाणे मुल्यमापन कामासाठी आवश्यक असेल तेव्हा संबंधित तज्ञांना वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत आणि आवश्यक सहकार्य करण्याबाबत कार्यवाही करावी. यासाठी संबंधित कृषि विकास अधिकारी यांनी संशोधन संचालक, कृषि विद्यापीठ, यांचेकडे माहिती पाठविण्यात यावी. मुल्यमापनाचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयामार्फत आयुक्तालयास सादर करण्यांत यावा.

**१६) प्रगती अहवाल-**

जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजनेचा मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्रपत्र-३ मध्ये, औषध वाटपाचा अहवाल दर तीन महिन्यांनी प्रपत्र-४ मध्ये आणि औषध तपासणीबाबतचा अहवाल दर सहा महिन्यांनी प्रपत्र-५ मध्ये कृषि आयुक्तालयास न चुकता पाठविण्याची व्यवस्था करावी.

# जिल्हा नियोजन व विकास मंडळाने मंजुर केलेला जिल्हानिहाय नियतव्यय - सन २०१४-१५

(रु. लाखात)

| अ.क्र. | जिल्हा | सर्वसाधारण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ठाणे | ५.०० |
| २ | रायगड | १०.०० |
| ३ | रत्नागिरी | १०.०० |
| ४ | सिंधुदुर्ग | १५.०० |
| **कोंकण विभाग** | | **४०.००** |
| ५ | नाशिक | १०.०० |
| ६ | धुळे | १.०० |
| ७ | नंदुरबार | १.०० |
| ८ | जळगांव | १५.०० |
| **नाशीक विभाग** | | **२७.००** |
| ९ | अहमदनगर | ५.०० |
| १० | पुणे | ५.०० |
| ११ | सोलापूर | २०.०० |
| **पुणे विभाग** | | **३०.००** |
| १२ | सातारा | ४.०० |
| १३ | सांगली | ४.०० |
| १४ | कोल्हापूर | ५.०० |
| **कोल्हापुर विभाग** | | **१३.००** |
| १५ | औरंगाबाद | २.०० |
| १६ | जालना | २.०० |
| १७ | बीड | २.०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **६.००** |
| १८ | लातूर | २.०० |
| १९ | उस्मानाबाद | २.०० |
| २० | नांदेड | २.०० |
| २१ | परभणी | २.०० |
| २२ | हिंगोली | २.०० |
| **लातूर विभाग** | | **१०.००** |
| २३ | बुलढाणा | २.०० |
| २४ | अकोला | २.०० |
| २५ | वाशिम | २.०० |
| २६ | अमरावती | ५०.०० |
| २७ | यवतमाळ | १५.०० |
| **अमरावती विभाग** | | **७१.००** |
| २८ | नागपूर | २०.०० |
| २९ | वर्धा | ५.०० |
| ३० | भंडारा | २.०० |
| ३१ | गोंदिया | २.०० |
| ३२ | चंद्रपूर | २.०० |
| ३३ | गडचिरोली | २.०० |
| **नागपूर विभाग** | | **३३.००** |
| **एकूण महाराष्ट्र** | | **२३०.००** |

**प्रपत्र-१**

**जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना सन २०१४-१५**

**फलोत्पादन पिकांसाठी पिक निहाय लागणारे सुधारीत औषध, परिमाण व फवारणी अनुदान**

| अ. क्र | पिकाचे नांव | किडी रोग | भौतिक लक्ष्य (हेक्टर) | औषधाचे नांव | औषधाचे परिमाण | प्रति हेक्टरी लागणाऱ्या औषधाची एकूण किंमत (रुपये) | प्रति हेक्टरी ५० टक्के फवारणीचे सुधारीत अनुदान (रुपये ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संत्रा | काळी/पांढरी माशी (कोळशी) | ४८१८ | **१ ली, ३री, ५ वी फवारणी** मोनोक्रोटोफॉस-३६-डब्ल्यू एससी | २१०० मिली प्रति हेक्टरी ३ फवारणी | रु.१७०२/- प्रति हेक्टरी ६ फवारणी | रु.८५१/- प्रति हेक्टरी ६ फवारणी |
| | | | | **२री, ४थी, ६वी** फवारणी डायमेथोऐट -३० ईसी | २४७५ मिली प्रति हेक्टर ३ फवारणीसाठी | | |
| २ | संत्रा | फायटोप्थोरा | ५६० | **१ ली, फवारणी** मेटॅलॅक्झील ७२-डब्ल्युपी | ७६०० ग्रॅम प्रति हेक्टर फवारणीसाठी | रु. १८९२६/- प्रति हेक्टरी फवारणी | रु.९४६३/- प्रति हेक्टरी फवारणी |
| | | | | **२ री, फवारणी** फोसेटील एएल-८० डब्ल्यूपी | ६९०० ग्रॅम प्रति हेक्टर फवारणीसाठी | | |
| ३ | आंबा | तुडतुडे व भुरी | २८२२ | **१-ली फवारणी** फेनवेलरेट | ५०० मिली प्रति हेक्टर | रु. २४०८/- प्रति हेक्टरी ५ फवारणी | रु.१२०५/- प्रति हेक्टरी ५ फवारणी |
| | | | | **२ री फवारणी** इमिडॅक्लोप्रीड १७.८ इसी | ३०० मिली प्रति हेक्टर | | |
| | | | | **३-री फवारणी** क्विनॉलफॉस २० ईसी + वेटेबल सल्फर ८० डब्ल्यूपी | २००० मिली + २००० ग्रॅम | | |
| | | | | **४थी फवारणी** डायमेथोएट ३० ईसी + वेटेबल सल्फर ८० डब्ल्यूपी | १००० मिली + २००० ग्रॅम | | |
| | | | | **५ वी फवारणी** कार्बारील ५० डब्ल्यु पी | १००० ग्रॅम | | |
| ४ | काजू | टीमॉस्कुटो | २९७ | **१ ली फवारणी** मोनोकोटोफॉस-३६ डब्ल्यूएससी | २१५० मिली प्रति हेक्टर फवारणीसाठी | रु.३०२७/- प्रति हेक्टरी फवारणीसाठी | रु.१५१३/-प्रति हेक्टरी फवारणीसाठी |
| | | | | **२ री फवारणी** प्रोफेनोफॉस ५० इसी | १५०० मिली प्रति हेक्टर फवारणीसाठी | | |
| | | | | **३ री फवारणी** कार्बारील | २८५० ग्रॅम प्रति हेक्टर प्रति फवारणीसाठी | | |
| ५ | नारळ | इरिओफाईड माईटस् | १६५ | अॅझाडिरॅकटीन ५ टक्के डब्ल्यूएससी. मुळाद्वारे | ३३७५ मिली प्रति हेक्टर ३ वेळा मुळाद्वारे | रु.९७२०/- प्रति हेक्टरी | रु.४८६०/-प्रति हेक्टरी |

| अ. क्र | पिकाचे नांव | किडी रोग | भौतिक लक्ष्य (हेक्टर) | औषधाचे नांव | औषधाचे परिमाण | प्रति हेक्टरी लागणा-या औषधाची एकूण किंमत (रुपये) | प्रति हेक्टरी ५० टक्के फवारणीचे सुधारीत अनुदान (रुपये ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | चिकू | बी- पोखरणारी अळी | १५३ | **१ ली फवारणी** डायक्लोरोव्हॉस ७६ इसी | ७०० मिली | रु.१३०३/- प्रति हेक्टरी ३ फवारणी | रु.६५२/- प्रति हेक्टरी ३ फवारणी |
| | | | | **२ री फवारणी** मेलॅथिऑन ५० ईसी | २००० मिली | | |
| | | | | **३-री फवारणी** मोनोकोटोफॉस-३६ डब्ल्यूएससी | ११०० मिली | | |
| ७ | चिकू | फळगळ | ३१ | **१ ली फवारणी** कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्ल्युडीपी | ५ किलो | रु.९६८४/- प्रति हेक्टरी जमिनीत मिसळण्यासाठी | रु.४८४२/- प्रति हेक्टरी जमिनीत मिसळणेसाठी |
| | | | | **२ री फवारणी** मेटॅलॅक्झिल + मॅन्कोझेब | २ किलो + २किलो | | |
| | | | | **३-री फवारणी** मेटॅलॅक्झिल + मॅन्कोझेब | ४ किलो +४किलो | | |
| ८ | केळी | करपा | १२९२ | मॅन्कोझेब | २००० ग्रॅम प्रति हेक्टरी फवारणीसाठी | रु. १८५९/- प्रति हेक्टरी ३ फवारणीसाठी | रु.९२९/-प्रति हेक्टरी ३ फवारणीसाठी |
| | | | | कार्बेनडेझीम | १२५० ग्रॅम प्रति हेक्टरी फवारणीसाठी | | |
| | | | | हेक्झाकोनॅझोल | २००० मिली प्रति हेक्टरी फवारणीसाठी | | |
| ९ | सुपारी | कोळेरोग | २९८ | कॉपर ऑक्सीक्लोराईड | ५५५० ग्रॅम प्रति हेक्टर ३ फवारणीसाठी | रु.२६८६/- प्रति हेक्टर ३ फवारणीसाठी | रु.१३४३/-प्रति हेक्टरी ३ फवारणीसाठी |
| १० | मिरची | चुरडा मुरडा | १६६६७ | **१ ली फवारणी** डायमेथोएट + वेटेबल सल्फर ८० डब्ल्यूपी + कार्बेनडेझिम | २५० मिली + ११२५ ग्रॅम + १९० ग्रॅम | रु.५२९/- प्रति हेक्टरी २ फवारणीसाठी | रु.२६४/-प्रति हेक्टरी २ |
| | | | | **२ री फवारणी** डायमेथोएट ३० ईसी + वेटेबल सल्फर ८० डब्ल्युपी + कार्बेनडोझियम - | प्रति हेक्टर १ फवारणीसाठी २५० मिली + ११२५ ग्रॅम + १९० ग्रॅम प्रति हेक्टर १ फवारणीसाठी | | |
| ११ | बटाटा | करपा | २२०३ | कॉपरऑक्सीक्लोराईड ५० डब्ल्यूपी | १५०० ग्रॅम प्रति हेक्टर १ फवारणीसाठी | रु.७२६/- प्रति हेक्टरी १ फवारणीसाठी | रु.३६३/- प्रति हेक्टरी १ फवारणीसाठी |
| १२ | कांदा | करपा व फुलकिडे | ६६२० | मॅन्कोझेब ७५ डब्ल्यूपी + मॅलेथिऑन ५० इसी | १२५० ग्रॅम + ५०० मिली प्रति हेक्टर १ फवारणीसाठी | रु.५७४/- प्रति हेक्टरी १ फवारणीसाठी | रु.२८७ रु./- प्रति हेक्टरी १ फवारणीसाठी |
| | एकूण | | **३५९२६** | | | | |

**टीप :-** उपरोक्तप्रमाणे दिलेल्या पर्यायी शिफारशीमध्ये दर्शविलेल्या औषधापैकी इतर शिफारस केलेल्या औषधांची मागणी असल्यास त्याप्रमाणे मागणी नोंदविण्यास हरकत नाही.

प्रपत्र-२. जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना सन २०१४-१५ ( भौतिक लक्ष्य हेक्टर / आर्थिक लक्ष्य लाखात )

| अ.क्र | जिल्हा | संत्रा (कोळशी) | | संत्रा (फायटोथोरा) | | आंबा (तुडतुडे व भुरी) | | काजू (टीमास्कुटो) | | नारळ (इरिओफाईडमाईट) | | चिकू (बी पोखरणारी अळी) | | चिकू (फळगळ) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | ठाणे | ० | ०.०० | ० | ०.०० | ८३ | १.०० | ३३ | ०.५० | २१ | १.०० | १५३ | १.०० | ३१ | १.५० |
| २ | रायगड | ० | ०.०० | ० | ०.०० | ४१५ | ५.०० | ० | ०.०० | ६२ | ३.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३ | रत्नागिरी | ० | ०.०० | ० | ०.०० | ४१५ | ५.०० | १३२ | २.०० | ४१ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ०.०० | ० | ०.०० | ८३० | १०.०० | १३२ | २.०० | ४१ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **कोंकण विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **१७४३** | **२१.००** | **२९७** | **४.५०** | **१६५** | **८.००** | **१५३** | **१.००** | **३१** | **१.५०** |
| ५ | नाशिक | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ६ | धुळे | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ७ | नंदुरबार | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ८ | जळगांव | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **नाशीक विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| ९ | अहमदनगर | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| १० | पुणे | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ११ | सोलापूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ८३० | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **पुणे विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **८३०** | **१०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| १२ | सातारा | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| १३ | सांगली | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| १४ | कोल्हापूर | ० | ०.०० | ० | ०.०० | २४९ | ३.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **कोल्हापुर विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **२४९** | **३.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| १५ | औरंगाबाद | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| १६ | जालना | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| १७ | बीड | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| १८ | लातूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| १९ | उस्मानाबाद | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २० | नांदेड | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २१ | परभणी | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २२ | हिंगोली | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **लातूर विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| २३ | बुलढाणा | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २४ | अकोला | २३५ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २५ | वाशिम | २३५ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २६ | अमरावती | २३५० | २०.०० | ३१७ | ३०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २७ | यवतमाळ | ५८८ | ५.०० | १०६ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **अमरावती विभाग** | | **३४०८** | **२९.००** | **४२३** | **४०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| २८ | नागपूर | ११७५ | १०.०० | १०६ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २९ | वर्धा | २३५ | २.०० | ३२ | ३.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३० | भंडारा | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३१ | गोंदिया | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३२ | चंद्रपूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३३ | गडचिरोली | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **नागपूर विभाग** | | **१४१०** | **१२.००** | **१३७** | **१३.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** |
| **एकूण महाराष्ट्र** | | **४८१८** | **४१.००** | **५६०** | **५३.००** | **२८२२** | **३४.००** | **२९७** | **४.५०** | **१६५** | **८.००** | **१५३** | **१.००** | **३१** | **१.५०** |

**प्रपत्र-२.जिल्हा नियोजन विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना सन २०१४-१५ ( भौतिक लक्ष्य हेक्टर / आर्थिक लक्ष्य लाखात )**

| अ.क्र. | जिल्हा | केळी (करपा) | | सुपारी (कोळे रोग) | | मिरची (चुरडा मुरडा) | | बटाटा (करपा रोग) | | कांदा (करपा व फुलकिडे) | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | १७ | १८ | १९ | २० | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| १ | ठाणे | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३२१ | ५.०० |
| २ | रायगड | ० | ०.०० | १४९ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ६२६ | १०.०० |
| ३ | रत्नागिरी | ० | ०.०० | ७४ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ६६३ | १०.०० |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ०.०० | ७४ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०७८ | १५.०० |
| **कोंकण विभाग** | | **०** | **०.००** | **२९७.८४१** | **४.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **२६८७** | **४०.००** |
| ५ | नाशिक | ० | ०.०० | ० | ०.०० | १८९४ | ५.०० | ० | ०.०० | १७४२ | ५.०० | ३६३६ | १०.०० |
| ६ | धुळे | ० | ०.०० | ० | ०.०० | ३७९ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३७९ | १.०० |
| ७ | नंदुरबार | ० | ०.०० | ० | ०.०० | ३७९ | १.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३७९ | १.०० |
| ८ | जळगांव | १२९२ | १२.०० | ० | ०.०० | ३७९ | १.०० | ० | ०.०० | ६९७ | २.०० | २३६७ | १५.०० |
| **नाशीक विभाग** | | **१२९२** | **१२.००** | **०** | **०.००** | **३०३०** | **८.००** | **०** | **०.००** | **२४३९** | **७.००** | **६७६१** | **२७.००** |
| ९ | अहमदनगर | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १७४२ | ५.०० | १७४२ | ५.०० |
| १० | पुणे | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ८२६ | ३.०० | ६९७ | २.०० | १५२३ | ५.०० |
| ११ | सोलापूर | ० | ०.०० | ० | ०.०० | १८९४ | ५.०० | ० | ०.०० | १७४२ | ५.०० | ४४६६ | २०.०० |
| **पुणे विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **१८९३.९** | **५.००** | **८२६.४५** | **३.००** | **४१८१.२** | **१२.००** | **७७३१** | **३०.००** |
| १२ | सातारा | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ११०२ | ४.०० | ० | ०.०० | ११०२ | ४.०० |
| १३ | सांगली | ० | ०.०० | ० | ०.०० | १५१५ | ४.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १५१५ | ४.०० |
| १४ | कोल्हापूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ३७९ | १.०० | २७५ | १.०० | ० | ०.०० | ९०३ | ५.०० |
| **कोल्हापुर विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **१८९३.९** | **५.००** | **१३७७.४** | **५.००** | **०** | **०.००** | **३५२०** | **१३.००** |
| १५ | औरंगाबाद | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| १६ | जालना | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| १७ | बीड | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **२२७२.७** | **६.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **२२७३** | **६.००** |
| १८ | लातूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| १९ | उस्मानाबाद | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| २० | नांदेड | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| २१ | परभणी | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| २२ | हिंगोली | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| **लातूर विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **३७८७.९** | **१०.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **३७८८** | **१०.००** |
| २३ | बुलढाणा | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| २४ | अकोला | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | २३५ | २.०० |
| २५ | वाशिम | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | २३५ | २.०० |
| २६ | अमरावती | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | २६६७ | ५०.०० |
| २७ | यवतमाळ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ६९३ | १५.०० |
| **अमरावती विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **७५८** | **२.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **४५८८** | **७१.००** |
| २८ | नागपूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १२८१ | २०.०० |
| २९ | वर्धा | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | २६७ | ५.०० |
| ३० | भंडारा | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| ३१ | गोंदिया | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| ३२ | चंद्रपूर | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| ३३ | गडचिरोली | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ७५८ | २.०० |
| **नागपूर विभाग** | | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **३०३०.३** | **८.००** | **०** | **०.००** | **०** | **०.००** | **४५७८** | **३३.००** |
| **एकूण महाराष्ट्र** | | **१२९२** | **१२.००** | **२९८** | **४.००** | **१६६६७** | **४४.००** | **२२०४** | **८.००** | **६६२०** | **१९.००** | **३५९२६** | **२३०.००** |

# प्रपत्र -३

| अ.क्र. | जिल्हा /विभाग | फळपिकाचे नाव | कि ड / रोगाचे नाव | भौतिक ( हेक्टर) | | महमंडळाकडे औषध मागणी केल्याचा पत्र क्रमांक व दिनांक | फवारणीसाठी वापरावयाच्या औषधाचे नाव | औषधाचा तपशील | | | अनुदानाचा तपशील (रु.लाखात) | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लक्ष्य | साध्य | | | मागणी | पुरवठा | वाटप | मंजूर अनुदान | खर्च | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी

कृषि विकास अधिकारी

/ विभागीय कृषि सहसंचालक

# प्रपत्र - ४

## औषध वाटपाचा तपशील

| अ.क्र. | महामंडळाकडे औषध मागणी केलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक | औषधाची केलेली मागणी (लिटर/ किलो) | औषधाचा झालेला पुरवठा (लिटर/ किलो) | शेतक-यांना वाटप केलेले औषध (लिटर/ किलो) | महामंडळास अदा केलेली अनुदानामधील ५० टक्के रक्कम (रु.लाख) | वसुलीचा तपशील (रु.लाख) | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | लाभार्थीकडून वसुल करावयाची रक्कम | लाभार्थीकडून वसुल केलेली रक्कम | अद्याप वसुल करावयाची रक्कम | महामंडळाकडे भरणा केलेली रक्कम | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

स्वाक्षरी
कृषि विकास अधिकारी /
विभागीय कृषि सहसंचालक

## प्रपत्र - ५

### औषध तपासणी

| अ. क्र. | जिल्हा | महामंडळाकडून झालेला औषधाचा पुरवठा (लिटर/ किलो) | तपासणी नमुने | | | | अप्रमाणित नमुन्याची रक्कम | महामंडळाकडून अप्रमाणित नमुन्याची वसूल केलेली रक्कम (रु.लाखात) | महामंडळाकडून वसूल केलेली रक्कम कोषागारात भरणा केलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तपासणीसाठी काढावयाचे नमुने संख्या | तपासणीसाठी काढलेले नमुने संख्या | तपासणीनंतर प्रमाणित झालेले नमुने | अप्रमाणित झालेले नमूने | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

स्वाक्षरी
कृषि विकास अधिकारी /
विभागीय कृषि सहसंचालक